# प्रेसनोट

दि. २०/१२/२०२३

## शिरुर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथील सहायक पोलीस उपनिरीक्षकावर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | शिरुर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ६५ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | राजेंद्र दगडु गवारे, वय ५३ वर्ष, पद - सहायक पोलीस उपनिरीक्षक, शिरुर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | १०,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १०,०००/- रुपये |
| पडताळणी दिनांक | २०/१२/२०२३ |
| सापळा दिनांक | २०/१२/२०२३ |

ठिकाण :- तहसिलदार कचेरी कार्यालयाचे समोरील मित्रधन चहाची टपरीमध्ये, ता. शिरुर, जि. पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार व त्यांच्या मुलाविरुद्ध माहे एप्रिल / २०२१ मध्ये शिरुर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २२१/२०२१, भा.दं.वि. कलम ३२६, ३२३, ५०४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्याचा तपास लोकसेवक सहायक पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र गवारे हे करीत होते. सदर गुन्ह्यामध्ये लोकसेवक राजेंद्र गवारे यानी तक्रारदार यांचेकडे त्यांना व त्यांचे मुलास अटक न करण्यासाठी तसेच गुन्ह्यात मदत करण्यासाठी ५०,०००/- रुपये लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक राजेंद्र गवारे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांना व त्यांचे मुलास गुन्ह्यामध्ये अटक न करण्यासाठी तसेच गुन्ह्यात मदत करण्यासाठी तडजोडीअंती १०,०००/- रुपये लाच रक्कम पंचासमक्ष मागणी करुन, लोकसेवक राजेंद्र गवारे यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये १०,०००/- (दहा हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली. लोकसेवक राजेंद्र गवारे याना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध शिरुर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण वरील प्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रणेता सांगोलकर तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकावर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७) ऑनलाईन अ‍ॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.